जनता शिक्षण मंडळ, अर्जुन नगर, जिल्हा कोल्हापूर येथील देवचंद कॉलेज व मोहनलाल दोशी विद्यालयातील विद्यार्थ्यांना सन २०१४-१५ ते २०१७-१८ पर्यंत ई.बी.सी. सवलत मंजूर करुन निधी वितरणास प्रशासकीय मान्यता देणेबाबत....

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांक:- ईबीसी-२०१८/प्र.क्र.४०/एसडी-५
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक :- २३ मार्च, २०१८.

संदर्भ :-

१. शासन निर्णय शिक्षण व समाजकल्याण विभाग क्र. इबीसी १७६३/एच, दि.१९ जून, १९६४.
२. शासन निर्णय शिक्षण व समाजकल्याण विभाग क्र. इबीसी १७६३/एच, दि.१९ जून, १९६४.
३. शासन निर्णय शालेय शिक्षण विभाग क्र. इबीसी १०९२/१२२१/साशि-५, दि.१९ मार्च, १९९३.
४. शासन निर्णय शालेय शिक्षण विभाग क्र. इबीसी १०९७/१०००/(३२७/९७)/साशि-५, दि.३० मार्च, १९९८.
५. शिक्षण संचालक यांचे पत्र क्र. शिष्यवृत्ती-२२३/२०१७-१८/ईबीसी प्रस्ताव-अर्जुननगर/१८१७, दि.३० मार्च, २०१८.

प्रस्तावना :-

देवचंद कॉलेज व मोहनलाल दोशी विद्यालय, अर्जुन नगर,जिल्हा कोल्हापूर या सीमावर्ती भागातील शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक अडचणींचा विचार करुन त्यांना सन १९६४-६५ पासून खास बाब म्हणून ई.बी.सी.सवलत देण्यात येते. उपरोक्त शासन निर्णय दिनांक ३० मार्च,१९९३ आणि शासन पत्र दिनांक ५ मार्च,१९६५ मधील पूर्वीच्याच अटी व शर्तीनुसार,सदरहू संस्थेतील विद्यार्थ्यांना त्यांच्या महाराष्ट्रातील पालकांच्या उत्पन्नावर ई.बी.सी. सवलत सन २०१३-१४ पर्यंत मंजूर करण्यात आली होती. आता त्यापुढील सन २०१४-१५ ते २०१७-१८ या कालावधीकरिता ई.बी.सी.सवलत मंजूर करुन निधी वितरणास प्रशासकीय मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय :-

महाराष्ट्र कर्नाटक सीमा तंटा अद्यापही न सुटल्यामुळे जनता शिक्षण मंडळ, अर्जुन नगर,जिल्हा कोल्हापूर संचलित देवचंद कॉलेज व मोहनलाल दोशी विद्यालयातील विद्यार्थ्यांना ई.बी.सी. सवलत यापुढेही पूर्वीप्रमाणेच खास बाब म्हणून चालू ठेवणे आवश्यक आहे. सबब, सदर कॉलेज व विद्यालयातील विद्यार्थ्यांना सन २०१४-१५ ते २०१७-१८ पर्यंत ई.बी.सी. सवलत चालू ठेवण्यास शासन मंजूरी देत आहे. तसेच ई.बी.सी. सवलतीची थकित देयके अदा करण्यासाठी सन २०१४-१५ ते सन २०१६-१७ या वर्षातील एकूण थकित रक्कम रु.४,६५,९७४/- (रुपये चार लाख पासष्ट हजार नऊशे चौ-याहत्तर फक्त) व सन २०१७-१८ या वर्षातील रक्कम रु. १,७०,७३०/- अशी एकूण रु. ६,३६,७०४/- एवढी रक्कम खर्च करण्यास प्रशासकीय मंजूरी देण्यात येत आहे. पूर्वीच्याच अटी व शर्ती सन २०१४-१५ ते २०१७-१८ साठी देखील लागू राहतील.

२. सदर सवलती प्रित्यर्थ होणारा खर्च मागणी क्र.ई-२, २२०२, सर्वसाधारण शिक्षण, ८०, सर्वसाधारण, ८०० इतर खर्च, (०२)(११) ज्यांचे किंवा ज्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रु.१५,०००/- पेक्षा अधिक नाही अशा इयत्ता १० वी पर्यंत शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांना (मुलांना) फी माफी (२२०२ १४७४) ३४, शिष्यवृत्त्या/विद्यावेतने या लेखाशिर्षाखाली सन २०१७-१८ च्या मंजूर तरतूदीमधून भागविण्यात यावा.

३. सदर निधी वितरीत करण्यासाठी आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. तसेच सहाय्यक संचालक (लेखा), माध्यमिक व उच्च माध्यमिक,शिक्षण संचालनालय, पुणे यांना या शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात येणाऱ्या निधीकरिता आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे

४. हा शासन निर्णय वित्तीय अधिकार नियम, १९७८ भाग-पहिला उपविभाग-तीन मधील अनुक्रमांक ४, परिच्छेद क्र.२७ (२) अन्वये प्रशासकीय विभागास असणा-या अधिकारान्वये निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०३२३१७१३४५९८२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Neha Nandkumar Humraskar

Digitally signed by Neha Nandkumar Humraskar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=fad9131f2c2ae9d6d9bb053715c4b9e08b15382beb01922a7bf2c233de3f7a45, cn=Neha Nandkumar Humraskar
Date: 2018.03.23 17:16:16 +05'30'

(नेहा नं. हुमरसकर)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.मंत्री (शालेय शिक्षण) यांचे स्वीय सहायक.
२. मा. विरोधी पक्षनेता (विधानसभा/विधानपरिषद).
३. मा.प्रधान सचिव, (शालेय शिक्षण व क्रीडा विभाग) यांचे स्वीय सहायक.
४. मा.आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे-१
५. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
६. सहाय्यक संचालक (लेखा), माध्यमिक व उच्च माध्यमिक,शिक्षण संचालनालय, पुणे
७. विभागीय शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर.
८. शिक्षण अधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद कोल्हापूर.
९. महालेखापाल (लेखा परीक्षा) महाराष्ट्र १ मुंबई
१०. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र १ मुंबई
११. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
१२. जिल्हा कोषागार अधिकारी, कोल्हापूर.
१३. प्राचार्य, देवचंद कॉलेज, अर्जुन नगर, जि.कोल्हापूर.
१४. मुख्याध्यापक, मोहनलाल दोशी विद्यालय, अर्जुन नगर, जि.कोल्हापूर.
१५. वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
१६. कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
१७. निवड धारिका एसडी.-५.